RNI No. MAHBIL /2009/35574

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ३४] शुक्रवार, जुलै ३, २०२६/आषाढ १२, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १०.००

असाधारण क्रमांक ७८

प्राधिकृत प्रकाशन

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ कोकण विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमान्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडून

नगरपरिषद प्रशासन शाखा

संदर्भ : (१) तपासणी अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांचेकडील पत्र जा.क्र.भिनिशमनपा/नि.ख.त.प./३२/२०२६ , दिनांक २७/०४/२०२६.

(२) राज्य निवडणूक आयोग आदेश क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणीकरण कक्ष ब, दिनांक १५/०२/२०२४.

(३) या कार्यालयात झालेली सुनावणी दिनांक २५/०५/२०२६ व दिनांक २९/०६/२०२६.

आदेश

क्रमांक नपप्र/कार्या-२/अनर्ह करण्याबाबत/२०२६-२७/५२०.— भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ करिता एकूण ४३८ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व कायदेशीर तरतुदींनुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने विहित मुदतीत आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, संदर्भ क्र. १ मधील तपासणी अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार २४ उमेदवारांनी आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर केलेला नाही.

त्यामुळे संदर्भ क्रमांक २ येथील राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, सदर उमेदवारांना अनर्ह घोषित करण्यासाठीचा नमुना सहा मधील प्रस्ताव भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका प्रशासनाकडून या कार्यालयास सादर करण्यात आला होता.

सदर उमेदवारांना नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार आपली बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी या कार्यालयात दिनांक २५ मे २०२६ व दिनांक २९ जून २०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीदरम्यान संबंधित उमेदवार हे अनुपस्थित राहिले. परिणामी, सदर उमेदवारांनी राज्य निवडणूक आयोगाच्या कायदेशीर आदेशांचे व तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मी, विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मला राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणीकरण कक्ष ब, दिनांक १५/०२/२०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १० (१ई) नुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये निवडणूक लढवूनही विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न केल्याबद्दल, खालील तक्त्यात नमूद उमेदवारांना पुढील ३ (तीन) वर्षांच्या कालावधीसाठी महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यास व महानगरपालिका सदस्य होण्यास "अनर्ह" घोषित करण्यात येत आहे :—

अ.क्र.	उमेदवाराचे नाव	प्रभाग क्रमांक	अ.क्र.	उमेदवाराचे नाव	प्रभाग क्रमांक
१	कृतिका शरद पाटील	१अ	२	गायकवाड विजया अशोक	१ब
३	शरद पाटील	१ ड	४	अन्सारी रेहान मुस्ताक	२ड
५	तेजश्री सागर पाटील	३ब	६	शेख शोएब सलीम	३क
७	सलीम अन्सारी	४क	८	अन्सारी जरीना रफीउजमा	५अ
९	अन्सारी तुंबा शकील	५क	१०	खान रिजवान रहीमुल्लाह	१०ड
११	खान रविश हाजी ईखलाक	१०ड	१२	हाशमी इमरान अहमद इस्तेयाक	११अ
१३	मोमीन नदीम मोहम्मद मुस्तकिम	११ड	१४	अन्सारी कमरुन्निसा कासिम	१२क
१५	अजीम रहेमान शेख	१२ड	१६	अनुशा श्रीनिवास वेंगल	१६ब
१७	विजय पुरुषोत्तम कारमपुरी	१६ब	१८	घोईल रीतीषा महेश	१६क
१९	तांबे अस्मिता अरुण	१६क	२०	गायकवाड नितेश वामन	१६ड
२१	अंसारी सोहेल जावेद अहमद	१८ड	२२	निरबान मोहसिन जाकीर हुसैन	१८ड
२३	खान आजम मुक्तार	१९ड	२४	म्हात्रे सुशांत भास्कर	२०ब

सदर अनर्हतेचा कालावधी हा आदेश जारी झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

नवी मुंबई,
दिनांक २ जुलै, २०२६

रुबल अग्रवाल (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.